# भटक्या विमुक्तांच्या कादंबरीतील स्त्री जीवन

**प्रा.डॉ. राजेंद्र शा. हावरे**, राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर, भ्रमणध्वनी क्र. ९८९०३२७२५९

**प्रस्तावना:** स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मानवी जीवनामध्ये आमुलाग्र असे बदल होऊन जीवन जगण्याची सर्व परिमाणाची उलट तपासणी होऊ लागली बुध्दीनिष्ठ, वैज्ञानिक, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव अशा नव्या सामाजिक मूल्यांचा अंगीकार वा स्थापना होण्यासाठी तत्कालीन परिस्थिती व सामाजिक परिवर्तनवादी चळवळी सकस प्रयत्न करत होत्या. सामाजिक स्तरीकरणातील अनेक वंचित, मागास असे सामाजिक गट परिवर्तन करून सामाजिक, धार्मीक, सांस्कृतिक आदी श्रृंखलातून बंधनमुक्त होत पारंपारिक मूल्य व माणसाला गुलाम करणाऱ्या व्यवस्थेचा धिक्कार व नव्या समाजरचना व मूल्यांची स्थापना व्हावी असे प्रयत्न करत होती अशी व्यापक भूमिका घेऊन दलित, आदिवासी ग्रामीण स्त्री समूह वाटचाल करत होते. ह्या समूहाने साहित्याला चळवळीचे हत्यार बनवले. दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी साहित्य कलाकृतींनी राष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण केली त्याच बरोबर मराठी साहित्याला सकसता व वेगळी दिशा दिली १९७०-८० च्या दशकात भटक्या-विमुक्त समूह आपल्या जीवनसमुहाची अस्तव्यस्ता, पाल व भटकंतीची संस्कृती घेऊन साहित्याच्या प्रांतमध्ये दाखल झाला. दलित साहित्याचा एक भाग म्हणून जरी भटक्या-विमुक्ताच्या साहित्याचा विचार केला जात असला तरी त्याची अस्तित्वाची मांडणी वेगळी करावी लागेल असे दिसून येते. भटक्या-विमुक्ताची कादंबरी अस्तित्वासाठी संघर्ष करतांना दिसते जातपंचायत, माणूस व जनावरातील पोटासाठी मिटत जाणारी दरी, चोर, गुन्हेगारीचा शिक्का, उदरनिर्वाहाच्या साधनाचा अभाव, आर्थिक विपन्न अवस्थेतून आलेली व्यसनाधीनता, स्त्रीची होणारी विटंबना, अज्ञान, दारिद्रय आदी बाबींसह प्रशासन व प्रस्थापित समाजासमोर आपला जीवन बिला घेऊन उभा राहतो. "आमला माणूस म्हणून जगु द्या" अशी आर्त टाहो हा समूह साहित्याच्या माध्यमातून आज ही फोडत असल्याचे आढळते.

ग्रामीण, आदिवासी, दलित व शहरी अशीच आज ही समाजाची विभागणी करण्यात येते हजारो वर्षांपासून गावगाडया भोवती भटकंती करणारा अस्थिर समूह आज ही आढळतो. राहायला घर नाही, सांगायला गांव नाही, मतदान नाही, रेशनकार्ड नाही, उपजीविकेचे साधन नाही, एका गावात तीन दिवसांपेक्षा स्थिर न राहु शकणारा, जन्मजात गुन्हेगारी, चोर असा शिक्का असणारा हा भटका समूह जेंव्हा साहित्याच्या विश्वामध्ये दाखल झाला तेंव्हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची दखल घेण्यात आली. ज्याप्रमाणामध्ये आत्मकथन व कवितेची दखल घेण्यात आली त्याप्रमाणे कादंबरीच नोंद घेतांना दिसून येत नाहीत.

१८७१ चा ब्रिटिशाचा गुन्हेगारी कायदा आज ही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाळला जातो. पाल व भटकंती, तीन दगडाची चूल व जातपंचायत असे अनेक बंध भटक्या-विमुक्तांची कादंबरी अभिव्यक्त होत जाते. गावगाडयातील दलित समूहापेक्षा ही समूह वंचित आढळतो. सततची भटकंती व गुन्हेगारी कायद्यामुळे भटक्या-विमुक्तांची स्त्री अधिकच भरडली जाते. दिवसभर कष्ट करणे, अंगावर पुरेसे वस्त्र नाही, दोन वेळचे जेवण देखील नाही आठ-आठ दिवस अंघोळ न करणारी, तिची सावली व शरीराचा अमंगल वास येणाऱ्या स्त्रीचा मात्र गांवगुंड व नीतिभ्रष्ट पोलिस तिचा उपभोग घेतात ही एक स्थिती तर दुसऱ्या बाजुला स्वकुटूंबातील परवड, दुय्यमत्व व जातपंचातीची जाचकता आदी बंधनामध्ये बंदिस्त असणारी ही स्त्री भटक्याच्या कादंबरीतून तिचे अनोखे विश्व उलगडत जाते. अशोक पवार - पडझड दराकोस दर मुक्काम, संतोष पवार - मोहतराचा नवरा, लक्ष्मण गायकवाड - वकिल्या पारधी, वडारवेदना, प्रा. प्रकाश जाधव - तिम्मा, किशोर काळेचिरा, रावजी राठोड - गोढण आदी कादंबऱ्यामधून स्त्री जीवन परवड अधिक स्पष्ट होत जाते.

स्वसमाज व कुटूंबामध्ये तिला अत्यंत दुय्यम असे स्थान आहे. सतत कष्टाची कामे करून अथवा भीक मागून तिचे पोट ही भरत नाही. नवऱ्याचा सातत्याने मार, अंधश्रध्दा रूढी, परंपरांमध्ये कायम बंदिस्त असणारी ही स्त्री दिसते. अल्प वयात लग्न व मातृत्व ही येते, दरवर्षी पाळणा हा हालत ठेवला कोणत्याही प्रकाराचे नियोजन आढळून येत नाही. आज ही अन्न, वस्त्र, निवारा ह्या प्राथमिक गरजा ही पूर्ण झाल्या नाहीत हे महासत्ता होऊ इच्छीनाऱ्या भारताची शोकांतिका आहे असे म्हणता येईल. भटक्या समूहाची अस्थिरता व भटकंतीतून त्याची स्वतंत्र जातपंचायत ही अस्तित्वात आली आहे हा न्यायाधीश, नाईक म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर असतो हा न्याय-निवाडा दारू पिऊन दिला जातो त्यात ही स्त्रीचा गुन्हा असो वा नसो शिक्षा मात्र तिलाच दिली जाते. जिभेला चटका देणे, उकळत्या तेलातून पैसा काढून पतिव्रता सिध्द करणे, कपाळाला शेण लावणे, तोंडाला काळ लावणे असे शिक्षेचे स्वरूप आहे. जातपंचायतीचा निर्णय हा अंतीम असतो अन्यथा जातबहिष्कृत ही केले जाते अशी ही निमूटपणे स्वसमाज व कुटुंबाकडून होणारे अन्याय अत्याचार सहन करत आहे तर दुसऱ्या बाजुला प्रस्थापित समाजव्यवस्थेतील गांवगुंड व नीतीभ्रष्ट पोलिस अधिकारी त्यांच्या अब्रुचे लचके तोडण्याच्या संधीची वाट पाहत असतात. पोटाच्या खळगीसाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या हा संबंध येत असतो.

सौंदर्य हे स्त्रीला मिळालेले बहुमोल देणगी म्हणून उल्लेख केला जातो. मात्र तेच सौंदर्य भटक्या स्त्रीला म्हणजे शाप ठरतो. गांवगुंड व भ्रष्ट पोलिस हे कधी शिकार करतील याचा नेम नाही. प्रस्थापित समाजव्यवस्था भटके लोक म्हणजे चोर ही मानसिकता आज ही आढळते त्यांचे शिक्षा स्वरूप ही अत्यंत किळसवाणी आढळते. "मीरालाभी नागवी करत तिचे थान धरतात गांडीत काडया टोचतात आमच्या समाद्यांची नागवी वरात गावात नेतात तवर आमच्या समद्या बायांना वढत वढत पडक्या वाड्यात गडी-माणसं नेतात, काम उरकतात अन पुन्हा चौकात आनतात."[१]

असा अनेक घटना-प्रसंगामुळे माणूसकीला कालिमा फासणाऱ्या समाजव्यवस्थेचा विद्रप वास्तव चेहरा हा भटक्यांच्या एकुण कादंबऱ्यातून उलगडत जातो. ही स्त्री न्याय मागू शकत नाही कारण हा भटका समूह म्हणजे जन्मजात चोर, त्यामुळे "मुकी झवली हाक ना बोंब" अशी त्यांची विदारक स्थिती आज ही भटक्या विमुक्तांच्या स्त्री समूहाची आढळते.

भटका समूह आज अत्यंत केविलवाण्या स्थिती जीवनप्रवास करतांना आढळतो. अज्ञानामुळे प्रचंड प्रमाणामध्ये रूढी परंपरा व अंधश्रध्दा ही आढळते. भटका समूह आपण राजे-महाराजे व देव-देवतांच्या वंशज वा घराण्यातील आहोत अशी धारणा कित्येक समूहाची आढळून येते. त्यातून अनेक रूढी-परंपरांमध्ये ही स्त्री बंदिस्त दिसते. वडार समूहातील स्त्री अंगात चोळी न घालता साडी अथवा लुगडयाने संपुर्ण अंग झाकते त्याला ऐतिहासिक कारण ही स्त्री देते,

"आपण राम-सीताचे वंशज आहोत वनवासात असतांना सीतेला हरणाच्या चामडयापासून चोळी हवी होती. राम त्या हरणाला मारू शकला नाही. तेंव्हा सीतेने पण केला मी माझ्या अर्ध्या अंगावर कुठलेही वस्त्र घालणार नाही म्हणून सीता बिन चोळीची राहिल."[२]

हे अज्ञानत्व ही आढळते याला जातपंचायतीची ही मान्यता आहे जो नियम मोडेल त्याला जातबहिष्कृत केले जाते ह्या अंधश्रध्दातून त्यांच्या अधिकच बकाल झाले आहे. तिम्मा मधील - नगाम्मा, काशीबाई, इळनमाळ - मीरा, राधा, गोठण-याडी, फरेगी, मोहतराचा नवरा - सारजा, निला, अंधाराचे वारसदार - राधाबाई, सावित्री, दुस्काळ - गोदा, भागाबाई, आदी येणारे स्त्री पात्रे अनेक बंधनांमध्ये बंदिस्त असल्याचे आढळतात.

सततच्या भटकंतीमुळे स्त्री जीवन अधिकच असुरक्षित, दर्जाहीन, शारीरिक व मानसिक दृष्टीकोणांतून खालावले आहे. भीक मागून ती संपुर्ण कुटुंबाची काळजी करते. उन्ह, पाऊस, हिवाळा ह्या तीन ऋतूमध्ये तीचे भटकंती ही आढळते. बाळंतपण व त्यानंतर आरोग्याची काळजी ही घेतली जात नाही. भर पावसात बाळंतपण होते असे अनेक स्त्री पात्रे ह्या कादंबरीतून येतात.

"गाडीतले सामान इकडंतिकडं करून तिला गाडीमध्ये बसवली ती कन्हु लागली. मेले गं माय म्हणून रडू वरून झिमझिम पाऊस चालु होता, वात होईल म्हणून गाडीवर ताडपत्री टाकली आजुबाजुला साडया बांधुन तिचे बाळंतपण भर पावसात पार पाडलं. बाळंतीन बाईला खायला लागतया पण घरात तर खायला काही नव्हत."[३]

अशा विदारक स्थितीत बाळंतपण वा नवनिर्मितीचा ध्यास हा संपुर्ण भटक्या समूहाचा आढळतो असे अनेक समस्यांवर ह्या कादंबऱ्या प्रकाश टाकतात. मोहतराचा नवरा - संतोष पवार यांनी पारधी समूहातील जीवनावर ही कादंबरी प्रकाश टाकते. पारधी समूहातील स्त्री म्हणजे पैसा कमविण्याचे साधन ठरते. बोली स्वरूपामध्ये लिलाव होऊन वय, घर-दार असा कोणता ही विचार न करता जो जास्त पैसे देईल त्याच्यासोबत मोहतर लावले जाते याबरोबरच अन्य समस्यांची मांडणी ही कादंबरी करते.

चिरा-किशोर काळे यांची ही कादंबरी कोल्हाटी समाजातील वयात आलेल्या मुलीला एका रात्रीसाठी जो जास्त बोली लाविल त्याला नवनवरी सारखा शृंगार करून चिरा उतरविला जातो. अशा आशयाची स्त्री समस्या प्रधान ही कादंबरी आढळते. इळनमाळ, दर कोस दर मुक्काम - अशोक पवार यांनी स्त्री समस्यांचा वेध घेत कित्येक स्त्रींना तुरुंग व पोलिस स्टेशनामध्ये दिवस गेले असे ही आढळून येते वडारवेदना, वकिल्या पारधी - लक्ष्मण गायकवाड, अंधाराचे वारसदार, दुष्काळ - दादासाहेब मोरे यांनी भटकंती दरम्यानची होरपळत जाणाऱ्या स्त्री जगताचा आढावा घेतला आहे.

एकुणच प्रस्थापित स्त्री ही भटक्या विमुक्ताच्या स्त्रीकडे आज एक भिकारी, चोर म्हणून पाहते त्यामुळे एका भगिनीचे दु:ख ही दुसरी भगिनी ही समजून घेत नाही. त्याच बरोबर अन्य समूहातील स्त्री शिक्षण घेऊन संघटीत होत आहे. ती परिवर्तन चळवळीमध्ये सक्रिय होत आहे. मात्र भटक्या -विमुक्तांच्या स्त्रीपर्यंत वा पालपर्यंत ही चळवळ आली नाही त्याचबरोबर शिक्षणाचे अल्पप्रमाण आढळून येते. मरणकळा - सौ. जनाबाई गिऱ्हे, तीन दगडाची चूल - विमल मोरे, सुषमा अंधारे, ॲड. पल्लवी रेणके, अन्य काही स्त्रीया ह्या साहित्य व समाज चळवळीतुन पुढे येतांना दिसत आहेत.

'वतनदाराला एक गांव तर भिकाऱ्याला तीस गांव' ह्या मानसिकतेतून आज ही हा समूह बाहेर आला नाही. निमुटपणे अन्याय, अत्याचार सहन करत माळरानसारखा गप्पगार स्थिती आपल्या नशिबाला दोष देत पिढयापिढयाने झाले तो भटकंती करत आहे. एका बाजुला भारत महासत्ता होण्यासाठी एक पाऊल पुढे टाकीत आहे, तर दुसऱ्या बाजुला एक समूह भाकरीचा चंद्र शोधण्यात संपुर्ण आयुष्याचे वेचत आहे.

**निष्कर्ष :**

- भटक्यांच्या कादंबरीतून ह्या समूहाची जीवन जगण्याची विदारक स्थिती आढळते. अन्न, वस्त्र, निवारा ह्या पायाभूत सुविधा त्यांना आज ही मिळाल्या नाहीत.
- जतपंचायतीची जाचकता, नीतीभ्रष्ट पोलिस व गांवगुंडांच्या वासनांध नजरा, स्वसमाज व कुटूंबातील स्त्रीचे स्थानातील दुय्यमपणा लक्षात येतो.
- शारीरिक भूक ही दुय्यम वा गौण असून कधी-कधी अवैध मार्गाचा स्वीकार ही केला असेल परंतु पोटाच्या खळगी व्यतिरिक्त अन्य काही नाही असे दिसते.
- हे जग लेखकांनी स्वत:ही अनुभवले, पाहिलेले, सोसलेले आहे त्यामुळे वास्तवता ही प्रखर आढळते.
- प्रस्थापित समाज व पोलिस प्रशासनाने एक माणूस म्हणून जगु द्या अशी ही कादंबरी प्रयत्न करते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) पडझड - अशोक पवार, पृ.क्र. ४१
२) रडारवेदना -लक्ष्मण गायकवाड, पृ.क्र. ७०
३) तिम्मा - प्रा. प्रकाश जाधव, ९४
४) भटक्या- विमुक्तांचे अंतरंग - रामनाथ चव्हाण
५) पालावरचं जग -लक्ष्मण माने